# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उदयान व वृक्षप्राधिकरण विभाग

तळ मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र.२८१०३४०९


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मनपा/वृ.प्रा./मिरारोड/ २४६ /२०२२-२३ दिनांक :०६/०७/२०२२

प्रति,
सिस्टम ॲनालिस्ट,
मिरा भाईंदर महानगरपालिका

**विषय – संकेत स्थळावर जाहिर नोटीस सुचना प्रसिध्द करणेबाबत.**

उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभागाची मिरा भाईंदर महानगरपालिका क्षेत्रातील बाधित होणारी धोकादायक झाडे मुळासहित काढणे कामाची सोबत जोडलेली जाहिरात नोटीस सुचना मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

सोबत :- जाहिर नोटीस प्रत.

(कविता बोरकर)
सहाय्यक आयुक्त तथा
वृक्ष अधिकारी
मिरा भाईंदर महानगरपालिका

# मिरा भाईंदर महानगरपालिका

## उद्यान व वृक्ष प्राधिकरण विभाग

तळ मजला, प्रभाग समिती क्र.4, कै. विलासराव देशमुख भवन,
जांगिड इन्क्लेव्ह, कनकिया, मिरारोड (पुर्व), ता.जि.ठाणे-४०१ १०७. दुरध्वनी क्र. २८१०३४०९

स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र. मनपा/वृ.प्रा./मिरारोड/२४६/२०२२-२३ दिनांक : ०६/०७/२०२२

## // जाहीर नोटिस सुचना //

महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे जतन अधिनियम १९७५ च्या महाराष्ट्र अधिनियमानुसार केलेल्या सुधारणा विचारात घेऊन अधिनियमाच्या प्रकरण पाच कलम ८ (३) अन्वये या नोटीसीद्वारे असे जाहिर करण्यात येते की, खालील नमुद तक्त्यातील झाड काढणे करणेकामी प्रत्यक्ष पाहणी केली असता त्याचा तपशिल खालीलप्रमाणे.

| १. ओम शिवालय को.ऑ.हौ.सो.लि यांचे दि.१३/०६/२०२२ रोजीचे पत्र | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | वृक्षाचे नाव | उंची | संख्या | अदांजे वय | तपशील |
| १. | नारळ | ३० ते ३५ फुट | ०१ | १५ वर्ष | सदरचे झाड पोरवाल टॉवर को.ऑ.हौ.सो.लि.,बेवरली पार्क,मिरारोड (पु) येथिल सोसायटीच्या आवरात असून हया झाडामुळे ओम शिवालय को.ऑ.हौ.सो.लि, इमारत क्र.०२ सोसायटीला त्रास होत आहे. हे झाड केव्हाही पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. हे झाड धोकादायक असून या कारणास्तव झाड काढणे आवश्यक आहे. |

| २.प्लाझा विहार को.ऑ.हौ.सो.लि. यांचे दि. २०/०६/२०२२ रोजीचे पत्र | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | वृक्षाचे नाव | उंची | संख्या | अदांजे वय | तपशील |
| १ | नारळ | ४० ते ५० फुट | ०१ | ३० वर्ष | सदरचे झाड प्लाझा विहार को.ऑ.हौ.सो.लि,शांती पार्क मिरारोड (पु) येथिल सोसायटीच्या आवारात असून सोसायटीच्या दिशेने झुकलेले असून जोसच्या वाऱ्याने झाड पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकारता येत नाही. . हे झाड धोकादायक असून या कारणास्तव झाड काढणे आवश्यक आहे. |

| ३.नव-सिंधुदुर्ग को.ऑ.हौ.सो.लि. यांचे दि. २७/०६/२०२२ रोजीचे पत्र | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| अ.क्र | वृक्षाचे नाव | उंची | संख्या | अदांजे वय | तपशील |
| १. | नारळ | ४० ते ५० फुट | ०४ | ३० वर्ष | सदरची झाडे नव सिंधुदूर्ग को.ऑहौ.सो.लि,श्री सिद्धीविनायक नगर, पेणकरपाडा,पांडुरंग वाडी मिरारोड (पु) येथिल असून धोकादायकरित्या वाढलेली आहे. तसेच तीन नारळ हे झोपडपट्टीच्या दिशेने झुकलेले आहे.जोराच्या वाऱ्याने केव्हाही पडू जिवित व वित्तहानी ची शक्यता नाकारता येत नाही.तसेच एका नारळाच्या झाडाची मुळे पाण्याच्या टाकीत गेली आहे. ही झाडे सोसायटीच्या मैदानाच्या मध्ये आहे. या कारणास्तव सदरची झाडे मुळासहित काढणे आवश्यक आहे. |

| ४.सदगुरु कॉम्पलेक्स को.ओ.हौ.सो.लि यांचे दि. ०९/०२/२०२२ रोजीचे पत्र | | | | |
|---|---|---|---|---|
| अ.क्र. | वृक्षाचे नाव | उंची | संख्या | तपशील |
| १. | बॉटलपाम | १५ ते २० फुट उंच | ०१ | सदरचे झाड मिरारोड(पु.)बेवरली पार्क येथिल सदगुरु कॉम्पलेक्स सोसायटीच्या आवारात धोकादायकरित्या झाड असून झाड पडून जिवित व वित्तहानी होण्याची शक्यता नाकराता येत नाही. या कारणास्तव धोकादायक झाड मुळासहित काढणे आवश्यक आहे. |
| | | एकुण | ०१ | |

सदर प्रस्तावित वृक्ष तोडण्याची /स्थलातंरीत करण्याची परवानगी देण्याचा इरादा आहे. याबाबत नागरिंकाच्या काही हरकती तसेच सदर वृक्षांवर पक्षांची घरटी असल्यास जाहिर सुचना प्रसिद्ध झाल्यापासुन ७ दिवसाच्या आत लेखी स्वरुपात उप-आयुक्त (वृक्ष प्राधिकरण), उद्यान व वृक्षप्राधिकरण विभाग, मुख्य कार्यालय, भाईंदर (प.) येथे किंवा garden@mbmc.gov.in किंवा mbmc.garden@gmail.com या ई-मेल आयडी वर कळविण्यात यावे. तसेच मुदतीनंतर प्राप्त होणा-या हरकती/सुचनांचा विचार केला जाणार नाही याची कृपया नोंद घ्यावी.

(कविता बोरकर)
**सहाय्यक आयुक्त तथा**
**वृक्ष अधिकारी**
**मिरा भाईंदर महानगरपालिका**